सीएनआरक्रएमएचबीयु०२००१११२०२२ वारसा प्रमाणपत्र क्रमांक २८/२०२२

दाखल दिनांकः १४.११.२०२२
नोंदणी दिनांकः १४.११.२०२२
निकाल दिनांकः ११.०९.२०२३
कालावधी - वर्षे महिने दिवस
००  ०९  २७

---

बुलडाणा येथील दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी हेमलता भोसले )

वारसा प्रमाणपत्र क्र.२८/२०२२ नि. क्र. ३७

१. अक्सा अफरोज खान पठाण (मृतकाचा मुलगा),
वय २१ वर्ष, धंदा- शिक्षण,

२. शाहीनबानो अफरोज खान पठान (मृतकाचा पत्नी),
वय ४० वर्ष, धंदाः घरकाम

३. अल्फैज अफरोज खान पठाण (मृतकाची मुलगा),
वय १९ वर्षे, धंदाः शिक्षण,

४. अमिनखान सरदार खान (मृतकाचा वडील),
वय ७४ वर्षे, धंदाः निरंक,
सर्व रा. देउळगांव राजा, ता देउळगांव राजा,
जि बुलडाणा. ....अर्जदार

-विरुध्द-

जिल्हा पोलीस अधिक्षक,
जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय,
बुलडाणा. .... गैरअर्जदार

---

अर्ज - भारतीय वारसा हक्क कायदयाच्या कलम ३७२ प्रमाणे
वारसाप्रमाणपत्र मिळण्याकरिता

---

अर्जदारांतर्फेः विद्वान विधीज्ञ श्री. डी पी गोठी.
गैरअर्जदारांतर्फेः विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. बी. तायडे

---

## न्यायनिर्णय
( दिनांक ११.०९.२०२३ )

अर्जदारांचे थोडक्यात अर्ज कथनः

०१ अर्जदारांच्या मते की, अर्जदार क्र १ व २ ही मयताची अपत्ये आहेत तर अर्जदार क्र २ पत्नी व अर्जदार क्र ४ हे वडील असून ते मृतक अफरोज खान अमीन खान पठान यांचे कायदेशिर वारस आहेत. मृतक अफरोजखान अमीन खान पठान हे पोलीस खात्यात नोकरीस होते व त्यांचा दि २९.१२.२०२१ रोजी बुलडाणा येथे मृत्यू झाला. त्यांचे मृत्य नंतर नोकरी पासून मिळणारे लाभ हे गैरअर्जदार कार्यालयाकडे थकीत असून लाभ प्राप्ती करिता त्यांनी न्यायालयाचे वारसा प्रमाणपत्राची मागणी केली. करिता अर्जदारांना ते मृतकाचे वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जासोबत त्यांनी आवश्यक असणारे दस्त अभिलेखावर सादर केलेले आहेत. अर्जदारांशिवाय मृतकाचे इतर कोणीही वारस नाहीत.

०२ गैरअर्जदार यांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी नि १८ प्रमाणे त्यांचे लेखी म्हणने सादर केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदारांचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा आहे, अर्जामधे मृतकाचे निश्चित कोण वारस आहेत याबाबत स्पष्टता नाही. मयताच्या आईवडिलांच्या नावाने मृतकाने नामनिर्देशन करुन ठेवलेले आहे, परंतू अर्जामधे आईचे नांवाचा उल्लेख दिसून येत नाही. कायदयान्वये मृतकाच्या वर्ग १ च्या वारसास नोकरीचे लाभ व रक्कम अदा करणे आवश्यक आहे. परंतू कार्यालयाकडे किती रक्कम थकीत आहे व किती रकमाबाबत प्रमाणपत्र पाहिजे याचा उल्लेख नाही त्यामुळे नियमानुसार न्यायालयात भरावयाच्या कोट फीचा प्रश्न उद्भवतो. करिता अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०३ खटला न्यायप्रविष्ठ केल्यानंतर दैनिक सामना वृत्त पत्रात जाहीरनामा काढण्यात आला तो नि दस्त नि ०३ लगत आहे. त्या अनुषंगाने कोणीही आक्षेप नोंदविल्याचे दिसून येत नाही.

०४ माझे समक्ष खालील वाद मुद्दे उपस्थित झाले. त्या समक्ष मी माझे निष्कर्ष नोंदवून खालील प्रमाणे कारण मिमांसा देत आहे.

| अ क्र | वाद मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार हे मयताचे कायदेशिर प्रतिनीधी आहे हे अर्जदार सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| ०२ | अर्जदार विनंती प्रमाणे मयताचे वारसाचे प्रमाणत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ०३ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

मुद्या क्र ०१ व ०२ करिताः

०५. प्रस्तुत प्रकरणाचे पुष्टयर्थ अर्जदारातर्फे अर्जदार क्र १ अक्सा अफरोज खान पठान यांनी त्यांचे प्रतिज्ञेवर शपथपत्र नि. क्र. २२ वर सादर केले आहे. त्यांनतर गैरअर्जदार क्र २ यांनी नि ३० सादर करुन मृतकाची किती रक्कम कार्यालयाकडे थकीत आहे याबाबत स्पष्टीकरण केले आहे. त्यामधे गॅच्युटी, भविष्य निर्वाह निधी, गट विमा निधी, रजा रोखीकरण व गट विमा बचत निधी अशी एकूण ९,०३,७४६ अक्षरी नउ लाख तीन हजार सातशे शेचाळीस रुपये एवढी रक्कम कार्यालयाकडे थकीत आहे असे कथन केले आहे. तसेच यादी नि ०३ लगत अफरोजखान यांचे मुळ मृत्यू प्रमाणपत्र

नि २६ वर तसेच अर्जदारांची आजी मयत असल्याबाबतचे मृत्यू प्रमाणपत्र नि २० वर सादर केलेले आहे. तसेच अर्जदार क्र १ ते ४ यांचे आधारकार्डाची छायांकित प्रत जोडली आहे. त्यानंतर अर्जदारांनी त्यांचा पुरावा बंद केल्याची पुरसिस नि ३२ वर सादर केली आहे.

०६ मृत्यू प्रमाणपत्रावरुन अफरोजखान यांचा दि २९.१२.२०२१ रोजी मृत्यू झाल्याचे दिसून येते तसेच अभिलेखावर सादर केलेले आधारकार्डावरुन मृतक अफरोजखान हे अर्जदार क्र १ व ३ चे वडील, अर्जदार क्र ३ चे पती आहेत असे दिसून येते तर अर्जदार क्र ४ हे मृतकाचे वडील असल्याचे समजते. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी कथनाशिवाय कोणताही पुरावा सादर केलेला नाही. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र १ यांचा उलटतपास घेतला, परंतु त्यावरुन अर्जदार हे मयताचे वारस नाहीत हे नाकारत नाहीत.

०७ मुस्लीम कायदयानुसार पुरुष मुसलमान मयत असल्यास त्याचे मालमत्तेत हिस्सेदार (sharer) व उर्वरित अवशिष्ट ग्राही (residue) हे अनुक्रमे वारसदार म्हणून घोषित होण्यास पात्र ठरतात. प्रस्तूत कामी अर्जदार क्र १ ते ४ हे हिस्सेदार व अवशिष्ट ग्राही या संकल्पनेत येत असल्याने ते मयताचे वारसदार असल्याचे दिसून येते.

०७ सदरचा दावा दाखल केल्यानंतर अर्जदार यांनी जाहीर नोटीस काढली होती ती नि १६ वर आहे. त्यास कुणीही आक्षेप घेतलेला नाही. अभिलेखावर आलेले दस्तांचे अवलोकन केले असता अर्जदार हे मयत अफरोज खान अमीन खान पठाण यांचे वारस आहेत हे सिध्द होते. करिता मुद्या क्र ०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येवून मुद्या क्र ०३ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यांत येत आहे.

२. अर्जदार हे मयत अफरोज खान अमीन खान पठान यांचे कायदेशिर वारस म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३ अर्जदारांना ते अफरोज खान अमीन खान यांचे कायदेशिर वारस आहेत असे प्रमाणपत्र न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर अदा करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HEMALATA SANTOSHKUMAR BHOSALE
Date: 2023.09.16 16:11:46 +0530

दिनांक ११.०९.२०२३ ( हेमलता भोसले )

दिवाणी न्यायाधीश व.स्तर,बुलडाणा.